उद्घाटन समारंभानंतर दुपारी दोन वाजता नरहर कुरुंदकर मुख्य रंगमंचावर 'थांबा ! दलित रंगभूमीचे आवर्त पुन्हा येतंय'., 'आधुनिक ? हे तर आमच्या लोकपरंपरेत आहे' या परिसंवादाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यानंतर नाट्य परिषदेच्या बडोदा शाखेचा नाट्यसंगीताचा कार्यक्रम व व्यावसायिक 'कलाकार रजनी' हा कार्यक्रम सादर करण्यात आला.

त्याचवेळी 'संगीत बावनखणी' 'घेई छंद', 'मी आनंदयात्री', 'रेशमाच्या धाग्यांनी', हे कार्यक्रम शंकरराव चव्हाण नाट्यगृहात सादर करण्यात आले.

अण्णासाहेब गुंजकर रंगमंचावर नाट्य परिषदेच्या परभणी, बीड, तुळजापूर शाखेने, जीवन विकास प्रतिष्ठान संचलित मूकबधीर विद्यालयाने, तसेच 'तन्मय ग्रुप' यांनी बालनाट्ये सादर केली. यानंतर 'एकनाथ गोडांबे' हा दिर्घांक, 'आकडा' ही एकांकिका व 'अचानक' हे नाटक सादर करण्यात आले.

'गोष्टीची गोष्ट', 'आई शप्पत', 'झेप घे रे' ही बालनाट्ये सादर करण्यात आली. त्यानंतर प्रायोगिक नाट्य महोत्सवाचे प्रा. दत्ता भगत यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. श्री. अशोकराव चव्हाण यांनी भुषविले होते. या कार्यक्रमास नाट्य परिषदेचे अध्यक्ष श्री. मोहन जोशी उपस्थित होते. यानंतर 'दुर्गा झाली गौरी', 'ढोलताशे' 'घाशीराम कोतवाल' ही प्रायोगिक नाटके कुसुम नाट्यगृहात सादर करण्यात आली.

कृष्णराव फुलांब्रीकर मुक्त मंच या रंगमंचावरुन प्रकाश लांडगे, कुंदा प्रधान , सदानंद चांदेकर, सुरेश पराजपे, मकरंद टिल्लू, श्रीपाद काळे, दिलीप खन्ना, जयंत ओक, किशोर पुराणिक आणि प्रभाकर निलेगांवकर यांनी एकपात्री प्रयोग सादर केले.

दुसऱ्या दिवसाची सुरुवात '२५ वर्षानंतरच मराठी नाटक' या परिसंवादाने करण्यात आली. त्यानंतर 'असं असतं नाटक राजा' आणि 'मराठी प्रेक्षकांना नाटक परवडण्यासाठी आपण काय करु शकतो.?' या परिसंवादाचे कार्यक्रम सादर करण्यात आले.

त्याचवेळी शंकरराव चव्हाण नाट्यगृहात सोलापूर शाखेने 'संगीत शाकुंतल - एक आढावा' हा कार्यक्रम सादर केला. त्यानंतर 'आमचं स्ट्रगलिंग' हा मुक्तसंवादाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमात मकरंद अनासपुरे, मंगेश देसाई, प्रतिक्षा लोणकर, विनोद लव्हेकर ह्या कलाकारांनी सहभाग घेतला.

यानंतर संमेलनाध्यक्ष प्रा. दत्ता भगत यांचे अध्यक्षीय भाषण आणि त्यावर त्यांच्याशी मुक्तसंवाद साधण्यात आला. आ. उल्हास पवार आणि श्री. मधुकर भावे यांनी 'रसिक मनाचे राजकारणी' हा कार्यक्रम सादर केला. संमेलनाध्यक्ष प्रा. दत्ता भगत यांच्या नाट्यकृतींचा वेध हा कार्यक्रम ओडिसी ग्रुप ऑफ स्पिरीट, नांदेड यांनी सादर केला. 'विक्स टाऊनचा गणेशोत्सव' हा कार्यक्रम नाट्य परिषदेच्या न्यू जर्सी शाखेने सादर केला.